फिर्याद

शहर पोलीस स्टेशन, भुसावळ
जि. जळगाव
दिनांक ०५/१०/२०२१

मी विठ्ठल पुंजो पाटील, वय ४१ वर्ष, व्यवसाय– मजुरी, रा. भुसावळ खडका रोड, पाटील मळा, भुसावळ फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियांसह राहावयास असून किराणा दुकानात कामास आहे.

भुसावळ शहर पोलीस स्टेशन
गु.र.नं. १८८/२०२१
भ्र.प्र.का.क.१९८८ चे कलम ७ प्रमाणे
स्टे.डा.नो.क्र. ३४/१४.१३
दि. ०५/१०/२०२१
पोहेका
भुसावळ शहर पो.स्टे.
पोलीस ठाणे अमलदार
भुसावळ शहर पो.स्टे.

माझे भुसावळ नगरपालिका हद्दीत स.न. ३५/२, प्लॉट नं ०८, क्षेत्र ३०.२६५ चौ.मी. असा प्लॉट असून सदर जागेवर सन २००२ पासून रहिवास करीत आहे. सदर प्लॉट बिनशेती परवानगी मिळण्याकामी मा. उपविभागीय अधिकारी साहेब, भुसावळ यांचे कार्यालयात प्लॉटचे सर्व कागदपत्र जोडून दिनांक २/६/२०२१ रोजी अर्ज दिला आहे. माझे काम वरील कार्यालयातील अव्वल कारकुन लोहार मॅडम यांचेकडे आहे. त्यांना यापुर्वी भेटलो असता त्यांनी मला सदर बिनशेती परवानगी मिळण्याकामी ४,९९२/–रु सरकारी चलनाव्यतिरीक्त माझेजवळ १०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तुमचे काम करून देईल, असे सांगितले होते. परंतु मला त्यांना लाच दयावयाची मुळीच ईच्छा नसल्याने सदर प्रकार मी माझा मित्र गणेश यास सांगितला. तेव्हा गणेश याने मला सदरबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडे तक्रार देणेबाबत सांगितले. त्यांनतर मी जळगाव येथे समक्ष जाऊन जळगाव अँन्टी करप्शन ब्युरोचे श्री.शशिकांत पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यांनतर त्यांनी मला तुम्ही काळजी करु नका, आम्ही तुमचे तक्रारीची दखल घेतो असे सांगितले.

दिनांक १७/०९/२०२१ रोजी सकाळी ९:०० वाचे सुमारास मला अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील पोलीस निरीक्षक श्रीमती वाघ मॅडम यांचा फोन आल्याने मी त्यांना भुसावळ येथील डीएमआर ऑफिसजवळील बीएसएनएल ऑफिसजवळ येणेबाबत कळविले. दुपारी १२:०० वाचे सुमारास श्रीमती वाघ मॅडम या त्यांचेकडील खाजगी वाहन क्रमांक एम.एच.२८ व्ही. ४७३० सोबत दोन पंचासंह सदर ठिकाणी दाखल झाल्यात. गाडीतील ड्रायव्हरला सूचना देऊन खाली उतरवून मला त्यांचेसोबत असलेल्या दोन्ही पंचांची ओळख करुन दिली. १).पंच– श्री.विजय सुरेशचंद्र गोसावी वय–५३ वर्ष, व्यवसाय –नोकरी, सहकार अधिकारी श्रेणी–२, उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव रा.गणेश पांर्क, पाटील बिल्डर्स यांचे घरासमोर, आशा बाबा नगर, जळगांव मो.नं. ९७६४४००५१३ २) पंच– श्रीमती पुष्पा माधव भताणे वय–४६ वर्ष, व्यवसाय–नोकरी, वरिष्ठ लिपीक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभाग, जळगांव रा. इंदिरा गांधी चौक, ग्रामपंचायत गल्ली, नशिराबाद ता.जि. जळगांव मो.नं. ८९९९०२८१७६.

त्यांनतर मी माझी लेखी स्वरुपात तक्रार लिहून दिली की, मी वरील ठिकाणी कुटूंबासह एकत्र राहतो व किराणा दुकान मजुरी काम करतो. माझे भुसावळ नगरपालीका हददीत स.नं. 35/2 प्लॉट नं.8 क्षेत्र 30.265 चौरस मीटर असा प्लॉट असून सदर जागेवर सन 2002 पासुन रहिवास करीत आहे.

सदर प्लॉट बीनशेती परवानगी मिळण्याकामी मा. उपविभागीय अधिकारी साहेब भुसावळ यांचे कार्यालयात प्लॉटचे सर्व कागदपत्र जोडून दिनांक 2/6/2021 रोजी अर्ज दिला आहे. माझे काम वरील कार्यालयातील शिरस्तेदार लोहारं मॅडम यांचेकडे आहे. त्यांना यापुर्वी भेटलो असता

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

त्यांनी माझेकडे 10,000/— रूपये लाचेची मागणी करून तुमचे काम करून दिईल असे सांगितले होते. परंतु माझी त्यांना लाच दयावयाची मुळीच ईच्छा नाही. करीता शिरेस्तदार लोहार मॅडम यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे.

लोहार मॅडम यांनी मागणी केलेली 10,000/— रूपये ही कोणतीही शासकिय फी नाही ती लाचच आहे याबाबत माझी खात्री झालेली आहे. तसेच त्यांचेत व माझेत कोणत्याही प्रकारचा देवाणघेवाणीचा व्यवहार नाही अगर भांडण तंटा नाही. तरी त्यांच्यावर कारवाई होण्यास विनंती आहे बाबत दिलेल्या तक्रारीवर दोन्ही पंच व वाघ मॅडम यांनी सहया केलेल्या आहेत.

त्यानंतर वाघ मॅडम यांनी मला व पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीची माहिती देवुन या तक्रारीबाबत पडताळणी करण्यासाठी मला व पंच नं. १ श्री. विजय गोसावी यांना माझे काका बनवून श्रीमती लोहार मॅडम, अव्वल कारकून यांची भेट घेण्यासाठी उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथे माझे ताब्यातील मोटार सायकलने रवाना केले व ठरल्याप्रमाणे याच ठिकाणी परत येण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर काही वेळाने मी व पंच क्र. १ हे आम्ही थांवुन असलेल्या ठिकाणी परत आल्यावर पोना/अमोल मराठे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन मला व पंच नं.१ श्री. गोसावी यांना रवाना केल्यापासुन ते परत येईपावेतो घडलेल्या घटनेबाबत पंच क्रमांक ०१ यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथे तक्रारदार यांचे ताब्यातील मोटार सायकलीने उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथील श्रीमती लोहार मॅडम यांची भेट घेण्याकरीता गेलो असता कार्यालयात हजर असलेल्या एका मॅडमशी व तक्रारदार श्री. पाटील यांचेत तक्रारदाराच्या कामासंबंधाने बोलणी झाली. चर्चेवेळी मला सदर मॅडम ही अव्वल कारकून श्रीमती लोहार असल्याचे समजले. तक्रारदाराने त्यांचे स्वत:चे प्लॉटचे अकृषिक करून परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दिल्याचे सांगून लोहार मॅडम यांना त्याबाबत विचारपूस केली. त्यावेळी लोहार मॅडम यांनी तक्रारदार यांना एका चतकोर कागदावर १०,०००/— रुपये असे अंकी लिहून तो कागद तक्रारदार यांचेकडे दिला. तक्रारदार यांनी तो कागद मला दाखविला. तो कागद मी पाहिला असता त्या कागदावर १०,०००/— रुपये असे अंकी लिहीलेले होते. तो मी समक्ष पाहिला आहे. त्यानंतर लोहार मॅडम यांनी तक्रारदार यांचेकडून १०,०००/— रुपये लिहिलेला कागद स्वत:चे ताब्यात घेऊन त्याचे बारीक बारीक तुकडे करुन फेकून दिला. सदरची घटना मी समक्ष पाहिलेली आहे." अशी लाचेची मागणी करून श्री. पाटील यांनी पैसे एक तासात घेऊन येतो असे सांगितले. अशी चर्चा झाल्यानंतर तक्रारदार व मी असे नियोजनाप्रमाणे ठरलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर माझेत व गै.अ. शिरस्तेदार श्रीमती लोहार मॅडम यांचेतील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषणाची स्क्रिप्ट तक्रारदार व दोन्ही पंचाच्या मदतीने पुन्हा ऐकुन त्याची स्क्रिप्ट पोना/अमोल मराठे यांनी खाजगी वाहनात लॅपटॉपवर तयार केली. सदर स्क्रिप्ट व पंच क्रमांक ०१ श्री. गोसावी यांचे जबाबावरुन लोहार मॅडम यांनी माझेकडे १०,०००/— रुपये लाचेची मागणी केलेली असल्याचे स्पष्ट झाल्याने यानंतर लागलीच सर्वानुमते यशस्वी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

वरीलप्रमाणे सर्वानुमते यशस्वी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आल्याने पंच क्र ०१ व ०२ यांचेसमक्ष मी माझेकडील बचतीतून आणलेले एकूण १०,०००/— रुपये हजर केले, त्यात ५००/—रुपये दराच्या एकूण २० चलनी नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून सापळापूर्व पंचनामा करण्यात आला.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

त्यानंतर दिनांक १७/०९/२०२१ रोजी १४:३० वाचे सूमारास श्रीमती वाघ मॅडम यांनी यशस्वी सापळा कारवाईकामी मला व पंचांना सापळा कारवाईच्या पुन्हा सूचना दिल्या. मी व पंच क्रमांक १ श्री. गोसावी असे श्रीमती लोहार मॅडम यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देणेकामी माझ्याकडील मोटारसायकलीने उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ श्रीमती वाघ मॅडम, पंच नं.२ श्रीमती पुष्पा भताणे तसेच जळगांव लाप्रवि व नंदुरबार लाप्रविचे अंमलदार असे यशस्वी सापळा कारवाईकामी उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथे हजर झालेत.

मी व पंच नं. १ श्री. गोसावी असे लोहार मॅडम यांना भेटण्यासाठी उपविभागीय कार्यालय भुसावळ येथे गेलो त्यादरम्यान श्रीमती लोहार मॅडम यांनी मला माझे कामानिमीत्त परत सोमवारी बोलविले असल्याने मी व पंच क्रमांक ०१ असे पुन्हा परत नियोजित ठिकाणी परत आलोत. आमचे पाठोपाठ श्रीमती वाघ मॅडम व इतर स्टाफदेखील पुवनियोजित ठिकाणी परत आला. पूर्वनियोजित ठिकाणी गेल्यानंतर पोना/मराठे यांनी माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर वाघ मॅडम यांनी पंच क्रमांक १ श्री.विजय गोसावी व पंच नं.२ श्रीमती पुष्पा भताणे यांचेसमक्ष पंच क्रमांक ०१ यांना विचारले असता त्यांनी कळविले की, "मी व तक्रारदार श्री.पाटील असे उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथे तक्रारदार यांचे ताब्यातील मोटार सायकलीने उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथील शिरस्तेदार श्रीमती लोहार मॅडम यांची भेट घेण्याकरीता गेलो असता त्यावेळी कार्यालयात बांधकाम व फ्लोअरींग बसविण्याचे इत्यादी काम चालु होते. सदर कार्यालयात एका रुममध्ये हजर असलेल्या लोहार मॅडमशी भेट झाली. भेटीदरम्यान कामासंबंधाने चर्चा होवून तक्रारदार यास लोहार मॅडम यांनी सांगितले की, दादा तुम्ही काबर थांबताहेत काही विषय नाही काही नाही काबर थांबताहेत तुम्ही, मी सांगितले की, चलनाचे पत्र चुकलं आहे सोमवारी चलनाचे पत्र बनवून देवू." असे सांगितलेनेमी व पंच नं.१ गोसावी असे कार्यालयातुन निघून आलो बाबत सांगितले.

मी व श्रीमती लोहार मॅडम यांचेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण हे पंच नंबर १ श्री. विजय गोसावी व पंच नंबर २ पुष्पा भताणे यांचेसमक्ष खाजगी वाहनात लॅपटॉप संगणकावर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन सुरु करुन माझेत व लोहार मॅडम यांचेत झालेले संभाषण ऐकले असता सदर संभाषणात लोहार मॅडम यांनी माझेकडून लाचेची मागणी केलेली लाचेची रक्कम १०,०००/– रुपये स्विकारले नाही, परंतु सोमवारी दि.२०/०९/२०२१ रोजी मला बोलविले असल्याने माझे सांगणेवरुन लोहार मॅडम हया माझेकडून पैसे घेतल्याशिवाय माझे काम करणार नाहीत, करीता सर्वानुमते पुन्हा दिनांक २०/०९/२०२१ रोजी यशस्वी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मला, पंच क्र. १ व २ तसेच स्टाफ यांना या कारवाईबाबत गोपनीयता ठेवणेबाबत सुचना देवून माझेकडे दिलेली लाचेची रक्कम १०,०००/–रु. मी श्रीमती वाघ मॅडम यांचे ताब्यात दिली.

दि.२०/०९/२०२१ रोजी नियोजनाप्रमाणे श्रीमती वाघ मॅडम त्यांचेकडील खाजगी क्रुझर गाडीने दोन्ही पंच, तसेच जळगाव व नंदुरबार अॅन्टी करप्शन ब्युरोचे स्टाफसह प्रलंबित कारवाईकरीता ११:०० वाचे सुमारास भुसावळ शहरातील कावेरी कॉलनी, मध्य रेल्वे बालउद्यान, भुसावळ या नियोजित ठिकाणी पोहचलो होतो. सदर ठिकाणी मी देखील उपस्थित होतो.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

त्यानंतर पुढील प्रलंबित कार्यवाही करण्याचे ठरल्याने दि. १७/०९/२०२१ रोजी अ.पा. लावून दिलेले एकूण १०,०००/—रूपये त्यात ५००/—रु. दराच्या एकूण वीस चलनी नोटा वाघ मॅडम यांचे सुचनेवरून पोना/अहिरे यांनी तक्रारदार व पंचासमक्ष हजर केल्या. सदर नोटा हया सापळापुर्व पंचनाम्यात दर्शविण्यात आल्या होत्या त्या नोटांचे नंबर व चलनी नोटा तपासले असता त्या बरोबर होत्या. त्यानंतर लाचेच्या सापळा कारवाईकामी उपयोगात आणावयाची अॅन्थ्रासिन पावडर व अॅल्ट्राव्हायलेट दिवा/टॉर्च यांचा उपयोग आणि त्यांचे गुणधर्माबाबतची माहिती पुन्हा खाजगी वाहनात दिली.

वाघ मॅडम यांनी यशस्वी सापळा कारवाईकामी मी व दोन्ही पंचांना सापळा कारवाईच्या पुन्हा सूचना दिल्या. त्यानंतर माझे व पंच क्रमांक १ श्री.गोसावी यांना मागणी केलेली लाचेची रक्कम देणेकामी मला वाघ मॅडम यांच्या सुचनेनुसार पोना/अमोल मराठे यांनी व्हॉईस रेकॉर्डर लावुन माझेकडील मोटारसायकलीने उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ श्रीमती वाघ मॅडम व त्यांचेकडील सापळा पथकासह यशस्वी सापळा कारवाईकरीता कार्यवाहीप्रमाणे उपविभागीय कार्यालय भुसावळ येथे विखुरलेल्या स्वरुपात दबा धरुन थांबले.

काही वेळानंतर मी श्रीमती लोहार मॅडम यांना भेटून उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथून कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे कार्यालयातुन बाहेर येऊन थांबलो ठिकाणी जाण्यासाठी रवाना झालो. त्यावेळी माझे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर पोना/अमोल मराठे यांनी बंद केले.

सदर ठिकाणी पोहोचल्यानंतर वाघ मॅडम यांनी पंच नं.१ श्री.विजय गोसावी यांना पंच नं.२ श्रीमती पुष्पा भताणे यांचेसमक्ष विचारल्याने पंच क्र ०१ यांनी कळविले की, "मी व तक्रारदार असे उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथे तक्रारदार यांचे ताब्यातील मोटार सायकलीने उपविभागीय कार्यालय, भुसावळ येथील अव्वल कारकुन श्रीमती लोहार मॅडम यांची भेट घेण्याकरीता गेलो असता, कार्यालयात एका रुममध्ये हजर असलेल्या लोहार मॅडमशी भेट झाली. भेटीदरम्यान कामासंबंधाने चर्चा होवून तक्रारदार यास लोहार मॅडम यांनी सांगितले की, साहेबांकडे सहीला ठेवलय मी, आणि तुम्हाला ते चलनाच पत्र आहे ते शासकीय चलन ते तुम्हाला भरावच लागेल. शासकीय चलन भरुन तुम्ही घेवुन या. तसेच शासकीय सगळ, आमच शेतसारा वगैरे काढायच असतना महसुली भाषा तुम्हाला काय कळेल, साहेबांकडे ठेवल हे तुम्ही चलन भरुन घेऊन या ऑर्डर होवुन जाईल." असे सांगितले.

त्यानंतर माझे व श्रीमती लोहार मॅडम यांचेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण हे पंच नंबर १ श्री. विजय गोसावी व पंच नंबर २ पुष्पा भताणे यांचेसमक्ष खाजगी वाहनात लॅपटॉप संगणकावर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन सुरु करुन ऐकले असता सदर संभाषणात लोहार मॅडम यांनी माझेकडून लाचेची रक्कम स्विकारण्यास वेळोवेळी टाळाटाळ केली. त्यानंतर मी सापळा कारवाईकामी दिलेली लाचेची रक्कम १०,०००/— रुपये मला पंचांसमक्ष परत करण्यात आली. माझेकडून लोहार मॅडम यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत याबाबत माझी व पंचांची खात्री झाली, म्हणून सदर कारवाई स्थगित करून तसा सविस्तर सापळा स्थगिती पंचनामा करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

तरी दि.१७/०९/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान श्रीमती लोहार मॅडम, अव्वल कारकून यांनी माझेकडे कामासंबंधाने बोलणी दरम्यान एका चतकोर कागदावर १०,०००/— रुपये असे अंकी लिहून तो कागद माझेकडे दिला. मी तो कागद पंच यांना दाखविला त्या कागदावर १०,०००/— रुपये असे अंकी लिहीलेले होते. तो पंच क्रमांक ०१ श्री. विजय सूरेशचंद्र गोसावी यांनी समक्ष पाहिला आहे. व आकडा लिहीलेला कागद लोहार मॅडम यांनी परत घेऊन त्याचे बारीक तुकडे करुन फेकून दिला आहे.

त्याअनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी गै.अ.लोकसेवक श्रीमती लोहार, अव्वल कारकून, उपविभागीय कार्यालय, भुसावळ यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन) अधिनियम सन २०१८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

तरी श्रीमती लोहार, अव्वल कारकून, उपविभागीय कार्यालय, भुसावळ मॅडम यांनी माझेकडे १०,०००/—रु. अशी लाचेची मागणी केली व पुढील सापळा कारवाई दरम्यान मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारणेस टाळाटाळ केली. म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टाईप केलेली फिर्यादि मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टाईप केलेली आहे.

हि फिर्याद दिली
दि. ०५/१०/२०२१

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner